07-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 07-04-2025 00:21 Page 1



# हरमल ते पेडणे, तेरेखोल रस्त्याची दुरावस्था

## रोड शोवर करोडो खर्च : वाहनचालकांत संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ६ :** येथील हरमल पंचायत क्षेत्रातील कोरगाव, पेडणे तसेच केरी तेरेखोल रस्त्याची हालत व दुरावस्था झाल्याने वाहनचालक संताप व्यक्त करीत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सदरचा रस्ता पूर्णतः खराब स्थितीत असून इतकी वर्षे खड्डेमय रस्त्यामुळे वाहन चालकांची त्रेधातिरपीट होत असते. पेडणे पर्यंतच्या १८ किलो मीटर रस्त्यात पूर्ण खड्डे असून कित्येक ठिकाणी चर खोदून ठेवल्याने अनेकांना वाहने हाकणे अवघड जाते.कित्येकदा रस्त्यावरील खड्ड्यांमुळे एकेरी वाहतुक होत असते.



कोरगाव : हरमल कोरगाव रस्त्याची झालेली दुरावस्था.

त्याचा फटका वाहनाचा अपघाताने होत असतो, असे वाहनचालक सुनील पेडणेकर यांनी सांगितले.

तसेच केरी तेरेखोल रस्त्याची स्थिती एखाद्या वाड्यावरील रस्त्यासारखी झाल्याने पर्यटकांत संताप आहे.पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी करोडो रुपये खर्च केले जातात,मात्र खड्डे भरण्यासाठी निधी उपलब्ध असू नये, याचे कोडे आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया पर्यटक देत असतात.

दरम्यान, मोपा विमानतळ प्रकल्पामुळे पेडण्यातील रस्ते चकाचक होईल, असा अंदाज होता. मात्र रस्त्याची दयनीय अवस्था पाहून सरकार वाहन कर व अन्य शुल्क भरमसाठ घेत असते,त्यामानाने रस्त्याची साधी निगा होत असल्याने वाहन चालकांवर अन्याय असल्याचे पेडणेकर यांनी नाराजीच्या सुरात व्यक्त केले.

देशी विदेशी पर्यटक इथल्या रस्त्याची दुर्दशा पाहून सरकारच्या नावे शंखनाद करीत आहेत.करोडो रुपये खर्चून,सरकार अनेक राज्यात व राष्ट्रात पर्यटन रोड शो करतात. मात्र इथे गल्ली सुविधा उपलब्ध करीत असल्याची प्रतिक्रया पर्यटक देत असल्याचे टॅक्सी व्यावसायिक पेडणेकर यांनी सांगितले. तरी सरकारने पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजवावे व किमान चतुर्थीपूर्वी चकाचक करण्याची मागणी वाहन चालकातून होत आहे.

पान १ वरून

## गंगा नदीतील डॉल्फिन्स धोक्यात !

शकतो. चीनच्या यांगत्से नदीतील बैजी डॉल्फिनप्रमाणेच गंगेच्या डॉल्फिनही नामशेष होण्याच्या मार्गावर जाऊ शकतात, असा इशारा त्यांनी दिला.

डॉल्फिनच्या संख्येत होणारी घट लक्षात घेऊन २००९ मध्ये भारत सरकारने गंगेतील डॉल्फिनला राष्ट्रीय जलचर प्राणी म्हणून घोषित केले. तसेच, २०२० मध्ये या प्रजातीच्या संवर्धनासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला.२०२४ मध्ये भारतात गंगेच्या डॉल्फिनसाठी समर्पित संशोधन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

गंगेतील डॉल्फिन अंध असून, ते त्यांच्या नैसर्गिक अधिवासात टिकून राहण्यासाठी इकोलोकेशन तंत्रावर अवलंबून असतात. मात्र, वाढता मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरणीय बदलांमुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

डॉल्फिनच्या संरक्षणासाठी सरकारी उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत असले तरी अजूनही मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. गंगेतील डॉल्फिनच्या संवर्धनासाठी आतापर्यंत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र, अजून बरीच वाटचाल बाकी आहे, असे रवींद्र कुमार सिन्हा यांनी स्पष्ट केले.

---------------



गिमोणे पिळगाव येथील श्री राम मंदिरात रामनवमी उत्सवनिमित्त शेकडो भाविकांनी उपस्थितीतराहून दर्शन घेतले. सकाळी धार्मिक विधी त्यानंतर सायली गर्दे यांचे कीर्तन दुपारी राम जन्मोत्सव साजरा झाला. त्यानंतर आरती तीर्थ प्रसाद. झाला. दोन दिवस विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. उत्सवनिमित्त सजलेली मूर्ती पाळणा सादर करताना भक्त मंडळी.

# आल्तिनो-पणजीत ‘अज्ञातकथा’ दीर्घांकाचे सादरीकरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** जागतिक रंगभूमी दिनानिमित्ताने अभिव्यक्ती पणजी आणि सुनापरांता गोवा सेंटर फॉर आर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आल्तिनो पणजी येथील सुनापरांता आर्ट सेंटरच्या प्रांगणात अभिव्यक्ती निर्मित अज्ञातकथा या नवीन दीर्घांकाचे प्रभावी सादरीकर करण्यात आले. सुरवातीला जागतिक रंगभूमी दिनाच्या संदेशाचे पूर्वा नाईक यांनी वाचन केले. अंतरा भिडे यांनी महाभारतातील अज्ञातवासात असलेल्या पांडवांना केंद्रस्थानी ठेवून अर्जुनाच्या ’बृहन्नला’ रूपावर बेतलेली पुनर्कल्पीत नाटिका लिहिली व ती अभिव्यक्तीचे कुशल दिग्दर्शक डॉ. साईश देशपांडे यांनी आपल्या प्रभावी संकल्पनेतून दिग्दर्शित करून व त्याला संगीताचा पोषक साज देऊन रंगमंचावर आणली. पर्यावरणीय रंगमंच हे या नाटिकेचे वैशिष्ट्य होते. प्रियांका वेरेकर यांचीलक्षवेधी कोरिओग्राफी, अविनाश च्यारी यांची दृश्यपूरक प्रकाश योजना, अलिशा मिनेझिस यांची साजेशी रंगभूषा, कपिल च्यारी यांचे प्रसंगाना साजेसे नेपथ्य तसेंच अंतरा भिडे (मुखवटे), राहुल मिवा (डिजिटल आर्ट), तानिया गायकवाड (मंच व्यवस्था), वेलिंग्टन (ध्वनी साहित्य), रोहन मंगेशकर (प्रकाश योजना साहित्य) यांनी तांत्रिक बाजू योग्य तऱ्हेने सांभाळल्या. यात प्रियांका वेरेकर, अभिषेक धावस्कर, मोहन चांदेलकर, कृपा वझे, अंतरा भिडे, तानिया गायकवाड, वरद तारी, डॉ. चित्रा मेकोथ, नवमी नाईक व मंदार जोग यांनी उत्कृष्ट भूमिका वठविल्या.



# गाळेल येथे तिलारी कालव्यामध्ये आढळला मृतावस्थेत बिबट्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. ६ :** बांद्याहून नजीक असलेल्या गोवा सिंधुदुर्ग सीमेवर गाळेल येथे तिलारी उपकालव्याच्या पाण्यात बिबट्या मृतावस्थेत आढळून आला आहे. मृतदेह कुजल्यामुळे तो चार दिवसांपूर्वी त्या ठिकाणी पडला असावा किंवा गोव्यातून वाहून याठिकाणी आला असावा असा संशय व्यक्त होत आहे. मृतदेह कुजल्याने घटनास्थळीच पंचनामा करून विच्छेदन करण्यात आले. कालव्यालगतच बिबट्याला दहन करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

महिन्याभरापूर्वी दाभिल येथील जंगलात पांडवकालीन विहिरीत वाघीण पाण्यात बुडून मृतावस्थेत आढळली होती. त्यानंतर आज बिबट्या पाण्यात बुडून मृत झाल्याची सलग दुसरी घटना घडली आहे.

ही घटना आज सायंकाळी उघडकीस आली. पाण्याच्या शोधात असताना तो कालव्यात कोसळला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. घटनास्थळ हे गाळेल येथील मुख्य रस्त्यापासून आतमध्ये जंगल भागात आहे. बिबट्याला पाहण्यासाठी घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. तिलारी उपकालवा हा गोवा व महाराष्ट्र राज्यांच्या सीमेवर आहे. सध्या पाणी सोडण्यात आल्याने कालव्यात ६ फूट खोल पाणी आहे. पाण्याचा प्रवाह देखील वेगवाग आहे.

कालव्याच्या लगतच स्थानिक शेतकऱ्यांच्या काजू बागायती आहेत. आज दुपारी याठिकाणी काजू गोळा करण्यासाठी गेलेल्या स्थानिकांना कुबट वास येऊ लागला. त्यांनी शोधाशोध केली असता कालव्याच्या तोंडावरच बाटल्यांच्या कचऱ्यात जनावर मृतावस्थेत असल्याचे दृष्टीस पडले. मात्र याठिकाणी कालव्याची उंची जास्त असल्याने व पाण्याला खोली असल्याने जनावर नक्की कोणते याचा उलगडा होत नव्हता. स्थानिक युवकांनी काठीच्या साहाय्याने पाहिले असता हा बिबट्या मृतावस्थेत असल्याचे स्पष्ट झाले. याची माहिती मिळताच स्थानिकांनी बिबट्याला पाहण्यासाठी गर्दी केली होती. बांदा वन खात्याला याची माहिती देण्यात आल्यानंतर बांदा वनपाल प्रमोद सावंत, वनरक्षक अतुल पाटील घटनास्थळी तात्काळ दाखल झालेत. सायंकाळची वेळ असल्याने व कालव्यात पाणी जास्त असल्याने बिबट्याला बाहेर काढण्यासाठी वनखात्याच्या रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. त्यांनी घटनास्थळी येत स्थानिकांच्या मदतीने बिबट्याला कालव्यातून बाहेर काढले. मृतदेह कुजल्याने त्याच्यावर त्याचठिकाणी चिकित्सा करण्यात आली. त्यानंतर तेथेच त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे वनख्यात्याच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे ही प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

# ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदायतर्फे पंढरपूर पायी वारीचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ६ :** श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय (मेणकुरे) तर्फे यावर्षी आषाढीनिमित्त पंढरपूर पाचवी पायी वारीचे आयोजन करण्यात आले आहे. डिचोली येथील मेणकुरे येथून बुधवार दि. २२ जून रोजी पायी वारीचे प्रस्थान होईल.

वारीच्या प्रवेशीकांचे वितरण व स्वीकारण्याचा कार्यक्रम वेळापत्रकानुसार पुढील प्रमाणे :- प्रवेशिका वितरण शनिवार दि. १२ एप्रिल व रविवार दि. १३ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत होईल. प्रवेशिका स्वीकारणे - शनिवार दि. १९ एप्रिल व रविवार दि. २० एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शिवलकर वाडा, तांबडा रस्ता, मुळगाव येथील उपाध्यक्ष सुरेंद्र गाड यांच्या निवासस्थानी स्वीकारले जातील. दिंडीचे प्रयाण रविवार दि. २२ रोजी सकाळी ७.३० वाजता श्री माऊली मंदिर - मेणकुरे येथून करणार तर शुक्रवार दि. ४ जुलै रोजी पंढरपूर क्षेत्री आगमन होईल. रविवार दि. ६ जुलै आषाढी एकादशी मध्ये सहभागी होतील. सोमवार दि. ७ जुलै रोजी सकाळी ८ वाजता पंढरपूर ते गोवा परतीचा प्रवास सुरू होईल. रविवार दि. १३ जुलै रोजी गंगापूजन (म्हामणे) होईल.

पूर्ण भरलेल्या प्रवेशिका, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वर्गणी रु. ३००० सहित संस्थेकडे ठरलेल्या वेळेत आणून द्याव्यात. श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय मेणकुरेच्या कार्यकारिणी समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले. अधिक माहितीसाठी चंद्रकांत वंसकर (९९२३७५००६४) यांच्याशी संपर्क साधावा.





# साळ येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ६ :** साळ येथील श्री सिद्धेश्वर माडवेश्वर आणि श्री गोपाळवस मुळपुरूष देवस्थानच्या कृपाशीर्वादाने श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या प्रांगणात श्रीराम जन्म सोहळा उत्सव (रामनवमी) उत्साहात संपन्न झाला. या रामनवमी उत्सव साळ ग्रामस्थ यांच्या सहकार्याने संपन्न झाला.

आज दुपारी सौ. श्रद्धा व श्री शरद निळकंठ राऊत या दांपत्याच्या यजमानाखाली पुरोहित महेश मराठे यांच्या पौरोहित्याखाली सर्व धार्मिक विधी संपन्न झाले. सुरूवातीलाच श्री राम स्थापना हा धार्मिक विधी झाला त्यानंतर दुपारी १२ वाजता श्रीराम जन्म सोहळ्याला सुरुवात झाली. श्री रामाला पाळण्यात घालण्यात आल्यानंतर उपस्थित दक्षता राऊत, दिप्ती राऊत यांच्या साथीने महिलांनी संगीताच्या तालावर श्री राम पाळणा गीत व राम गीते गायिली. यावेळी सचिन पडवळ यांनी हार्मोनियमवर तर गजानन राऊत यांनी तबलासाथ केली. तसेच महाआरती ही गायीली तसेच भाविकांनी पुष्पांजली वाहून तीर्थप्रसादाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

त्यानंतर नकूळ राऊत यांच्या व्यवस्थापनाखाली श्रीच्या तळीची व फळफळावळीच्या पावणीला सुरुवात करण्यात आली. हा सर्व कार्यक्रम उत्साहात झाला. तर रात्री ९.३० वाजता तीन अंकी नाटक संगीत सौभद्र हे श्री सिद्धेश्वर नाट्य मंडळ - वरचावाडा साळ तर्फे सादर करण्यात आले. शनिवारी दि. ५ एप्रिल रोजी श्री सिद्धेश्वर देवाचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला या दिवशी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर संध्याकाळी श्री ची अवसारांच्या साथीने श्री ची पालखी मिरवणूक गावात काढण्यात आली. तत्पूर्वी ही पालखी मिरवणूक श्री माडवेश्वर देवस्थान प्रांगणात नेऊन माडावरुन श्रीफळ काढून वाढवण्यात आले नि सार्वजनिक गाऱ्हाणे घालून पालखी मार्गस्थ झाली. त्यानंतर रात्र साडेअकरा वाजता श्री सिद्धेश्वर नाट्य मंडळ - वरचावाडा साळतर्फे घर माझं देवघर हा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला.

LOST

The Vat Refund Vouchers bearing No. 506 of Commercial Tax Office Ponda Ward issued to R R Realters registered under Goa value Added Vat Tax Act 2005 bearing TIN No. 30070205888 having register office at Shop No. G-3, Ashvek Residency St. Cruz Ponda Goa.

CHANGE IN NAME

I CAMILO MAXIMIAN JOSE D SOUZA R/O HNO 292 TAMBUDKI VADDO ARPORA NORTH GOA HAS CHANGED MY NAME FROM CAMILO MAXIMIAN D'SOUZA TO CAMILO MAXIMIAN JOSE D SOUZA HEREAFTER IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS AND I WILL BE CALLED OR KNOWN BY THE NAME CAMILO MAXIMIAN JOSE D SOUZA.

CHANGE IN NAME

I IDALINA NORONHA R/O HNO 1050 ESCRIVAO VADDO CANDOLIM NORTH GOA HAS CHANGED MY NAME FROM IDALINA FERNANDES TO IDALINA NORONHA HEREAFTER IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS AND I WILL BE CALLED OR KNOWN BY THE NAME IDALINA NORONHA.

# काणकोणात रामनवमीनिमित्ताने रथयात्रा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ६ :** काणकोणात यंदा दर वर्षीप्रमाणे रामनवमीनिमित्त ५ एप्रिल रोजी, सकाळी ८.३० वाजचा श्री रामाच्या मूर्तीचे प.पु. गोकर्ण मठाधीश श्री स्वामीजींच्याहस्ते पिरंपारिक रितीरिवाजानुसार श्री रामाच्या आकर्षक मुर्तीची स्थापना ना व त्यानंतर सकाळी राम रथ यात्रेला पर्तगाळ येथून सुरुवात झाली. संपूर्ण मतदार संघात फिरून नंतर संध्याकाळी ५.३० घ्या दरम्यान परत पर्तगाळ येथील मठात समारोप करण्यात आला.

यावेळी आयोजन समितीचे पंकज नाईक गावकर, प्रतीश प्रभुदेसाई, नंदीप भगत, सूरज नाईक गावकर, अमेय पुराणीक, सुनय कोमरपंत, रत्नाकर धुरी, अशोक धुरी, प्रमोद प्रभुदेसाई, शैला प्रभुदेसाई, सुधीर कोमरपंत, विपीन प्रभुगावकर, सतीश वेर्णेकर, संजू पागी, तेजस देसाई व दिलखूश शेट यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

ही राम रथ यात्रा सकाळी श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ येथून प्रयाण केल्यानंतर श्री परशुराम मंदिर पैंगीण येथे त्यानंतर श्री लक्ष्मीनारायण मंदिर पैंगीण येथे माशें येथील श्री निराकार मंदिर या ठिकाणी खुद्द सभापती रमेश तवडकर व अन्य रामभक्तांनी दर्शन घेतले, लोलयें येथील केशव दामोदर मंदिर या ठिकाणी स्थानिक महिलाकडून ओवाळणी स्विकारली. राजबाग - यातील येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, पाटणे येथील श्री देवगी पुरुष मंदिर या ठिकाणी पोहोचेल. पाळोळे येथील श्री भुमी पुरुष मंदिर, श्री नुतन मराठी विद्यालय देसाईवाडा, आगोंद सुहासिनीकडून ओवाळणी स्विकारली. धवळखाजन येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, तर साळेरी ,खोला येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, त्यानंतर मुडकूड, आगोंद येथील श्री लाखणेश्वर देवस्थानात महा आरती व महा प्रसाद वितरण व तासाभराचा विश्रांती घेऊन. काराशीर मळ, आगोंद येथील श्री हनुमान देवस्थानात व त्यानंतर गुळे, येथील श्री भुमी पुरुष देवस्थान, श्री मारुती मंदिर चावडी, काणकोण व संध्याकाळी श्रीस्थळ, काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानात व त्यानंतर संध्याकाळी श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ येथे पुजा व त्यानंतर या यात्रेची सांगता करण्यात आली.



काणकोण : राम रथ यात्रे निमित्त सभापती रमेश तवडकर यांनी मानें निराकार मंदिर प्रांगणात दर्शन घेतल्यानंतर सोबत नगरसेवक शुभम कोमरपंत, स्थानिक अजय लोलयेंकर व अन्य.



मांद्रे : गीत सावरकर कार्यक्रमात सहभागी कलाकार व प्राचार्य अरुण नाईक, महेश नागवेकर, स्नेहल गुरव कारखानीस, अजय नाईक सहभागी कलाकार आणि शिक्षक.

# मांद्रे सप्तेश्वर विद्यालयात ‘गीत सावरकर’ कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ६ :** सप्तेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय आणि सूर्या फाऊंडेशन गोवा यांच्यातर्फे सप्तेश्वर सभागृहात गीत सावरकर प्रयोग क्रमांक ३ हा स्वतंत्रवीर सावरकर यांच्या रचनावर आधारित गीतगायनाचा कार्यक्रम नुकताच झाला.

प्रारंभी ’गीत सावरकर’ कार्यक्रमाचे निर्मिती प्रमुख प्रा महेश नागवेकर यांनी प्रास्ताविक भाषणात सावरकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. समाजकारण, भाषाशुद्धी अशा अनेक आयामावर काम केले आहे. भारत देशाचे स्वातंत्य प्राप्त करण्यासाठी शत्रूला मारेपर्यंत झुंजेन अशी प्रतिज्ञा करणारे महान क्रांतीकारक होते असे सांगून त्यांचे विचार समाजाला तारक आहेत असे अभ्यासपूर्ण व ओघवट्या शैलीत सांगितले. सप्तेश्वर ऊ.मा.विद्यालयचे प्राचार्य अरुण नाईक यांनी सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला त्यानंतर स्नेहल गुरव कारखानीस यांनी ’जय देव जय शिवराय’ ही आरती सादर केली. हिंदू नृसिंह प्रभो शिवाजी राजा’ ही शिवस्तुती आणि ’आर्यबंधू हो उठा हा फटका’ सादर करून दाद मिळवली. अजय नाईक यांनी ’रतिरंग रेंगे धान’ हे नाट्यपद आणि ’यही पावोगे’ ही गझल सदर करुन वाहवा मिळवली. कु संचित मणेरीकर याने ’मर्माबंधातली ठेव ही’ आणि अर्कज नागवेकर यांनी शतजन्म शोधिता हे नाट्यपद पेश केले, तर ’ने मजसी ने’ आणि ’स्वातंत्यासुक्त ,सादर करून कार्यक्रमाची रंगात वाढवली. या कार्यक्रमातील सर्व गायक कलाकाराना प्रा अरुण नाईक यांनी पुष्प प्रदान स्वागत केले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली.